# प्रास्ताविक

# प्रास्ताविक

डॉ.विठ्ठल गोपाल खोबरेकर हे महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध इतिहास संशोधक म्हणून ओळखले जातात. इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात त्यांचे वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. महाराष्ट्रात वि. का. राजवाडे, वासुवादेवशास्त्री खरे, द. ब. पारसनीस, गो. स. सरदेसाई, सेतु माधवराव पगडी, ग. ह. खरे, त्र्यं. शं. शेजवलकर इ. नामवंत व निष्ठावंत इतिहास संशोधकांनी मराठा इतिहास लेखनाची व ऐतिहासिक साधने संकलित करण्याची जी थोर आणि उज्ज्वल परंपरा निर्माण केली. त्या परंपरपरेतील डॉ. वि. गो. खोबरेकर हे एक महत्त्वाचे संशोधक व लेखक होते. डॉ.खोबरेकर यांना मोडी लिपीचे उत्तम ज्ञान अवगत होते. असंख्य ऐतिहासिक कागदपत्रे ही प्रामुख्याने मोडी लिपीमध्ये आहेत. ही कागदपत्रे अभ्यासकांना अभ्यासणे सुलभ व्हावे यासाठी डॉ.खोबरेकर यांनी पुण्याचे पेशवे दप्तर व कोल्हापूर रेकॉर्ड कार्यालयातील मोडी लिपीतील ऐतिहासिक कागदपत्रांची वर्णनात्मक सूची तयार केली. त्यांनी भारतीय इतिहासाच्या मराठा काल व आधुनिक महाराष्ट्राच्या कालखंडासंबंधी लेखन केले. त्यांचे हे इतिहासलेखन व संशोधनाचे कार्य संशोधकांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरणारे आहे.

महाराष्ट्रातील काही व्यासंगी संशोधकांनी डॉ.खोबरेकरांच्या इतिहासविषयक लेखनाचा आणि संशोधनाचा आढावा घेण्याचा उल्लेखनीय प्रयत्न केलेला आढळतो. श्री. द. य. राजाध्यक्ष यांनी खोबरेकर यांच्या 'मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम' या ग्रंथाचा अभ्यास करून ग्रंथाचे महत्त्व सांगितले आहे. तर डॉ. ह. म. घोडके यांनी डॉ.खोबरेकर यांच्या महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढ्याच्या लेखनाचा आढावा घेतलेला आहे. डॉ.खोबरेकर यांच्या कार्यावर काही लेखही लिहिण्यात आले आहेत. तथापि, त्यांच्या संशोधन कार्याची व इतिहासविषयक त्यांच्या समग्र लेखनाची वस्तुनिष्ठ मीमांसा झाल्याचे आढळत नाही. शिवाय त्यासंबंधी तौलनिक अभ्यास होणेही अगत्याचे आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

डॉ.वि.गो.खोबरेकर यांच्या संशोधनकार्याची त्यांच्या इतिहासविषयक समग्र लेखनाची वस्तुनिष्ठ चिकित्सा करून त्यांचे एक इतिहासकार म्हणून मूल्यमापन करण्याच्या उद्देशाने प्रस्तुत प्रबंध लिहिला आहे. त्यासाठी डॉ.खोबरेकरांच्या बहुतेक सर्व प्रकारच्या लेखनाचा परामर्श घेतला आहे. त्यांच्या समकालीन इतिहासकारांचे लेखन व त्यांचे अभ्यासविषय, विविध दृष्टिकोन यांचा अभ्यास करून तौलनिक निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकूणच भारतीय इतिहासाच्या संशोधन व लेखनात डॉ.खोबरेकर यांनी दिलेल्या योगदानाचा विस्तृत आढावा प्रस्तुत प्रबंधात घेतला आहे.

या प्रबंधाची विभागणी एकूण पाच प्रकरणात केली आहे. पहिल्या प्रकरणात डॉ.खोबरेकरांचा जीवनपट सादर केला आहे. यामध्ये त्यांचे शिक्षण, व्यक्तीमत्त्व व कार्य यांचा आढावा घेण्यात आला आहे.

दुसऱ्या प्रकरणात मराठ्यांच्या इतिहासाचे अध्ययन, संशोधन व त्यांचे राष्ट्रीय दृष्टिकोनातून महत्त्व विशद करणे इत्यादीबाबत डॉ.खोबरेकरांनी बजावलेल्या मौलिक कामगिरीची सांगोपांग चर्चा केली आहे.

तिसऱ्या प्रकरणात इंग्रजी सत्तेविरूद्ध महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव व महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे या महत्त्वाच्या विषयांवर डॉ.खोबरेकर यांनी केलेले लेखन व संशोधन यांचा आढावा घेण्यात आला आहे.

चौथ्या प्रकरणात डॉ.खोबरेकर यांच्या ऐतिहासिक साधन साम्रुग्रीच्या प्रकाशनांची चिकित्सात्मक चर्चा केली आहे.तसेच इतिहासाची साधन संपत्ती समृद्ध करण्यामध्ये त्यांनी दिलेल्या योगदानाची चर्चा करण्यात आली आहे.

उपसंहाराच्या पाचव्या प्रकरणात संशोधनाचे महत्त्वाचे निष्कर्ष साररूपाने मांडले आहेत.

प्रबंधाच्या अखेरीस संदर्भ साधनांची सूची दिली आहे. डॉ.खोबरेकरांच्या नियतकालिकातील लेखांची सूची व डॉ.खोबरेकर यांच्यावर इतरांनी लिहिलेले लेख व

परिचय तसेच त्यांनी दिलेली व्याख्याने आणि त्यांनी संपादित केलेल्या महाराष्ट्र अकार्व्हइज बुलेटिन्सची माहिती तीन वेगवेगळया परिशिष्टात दिली आहे.

या निमित्ताने डॉ. वि. गो. खोबरेकर यांचे ऐतिहासिक लेखन अभ्यासण्याची सुवर्णसंधी मला लाभली. ही अमोल संधी उपलब्ध करून देण्यास मला अनेकांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य लाभले. त्या सर्वानी मला उत्तेजन दिले. त्याबद्दल या सर्वाचे ऋण व्यक्त करणे हे मी कर्तव्य समजते.

माझे मार्गदर्शक व शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. एम. ए. लोहार यांनी मला या कामी अतिशय आस्थेने व सातत्याने मार्गदर्शन केले. त्यांनी माझ्यासाठी घेतलेले परिश्रम, दिलेले प्रोत्साहन यामुळेच हे कार्य मी पुरे करू शकले. याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक ऋणी आहे. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या डॉ.बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील अर्काईव्हज विभागातील डॉ.बापूसाहेब माने यांनीही मला मार्गदर्शन केले. त्यांनी मला केलेल्या सहकार्यामुळेच मला हे काम करणे शक्य झाले. त्यामुळे त्यांचीही मी ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागातील डॉ.अरूण भोसले, डॉ.एम.पी.पाटील, डॉ.सौ.पद्मजा पाटील, डॉ.सौ.नंदा पारेकर, डॉ.अवनीश पाटील यांचेही मला प्रोत्साहन मिळाले. त्याबद्दल मी या सर्व गुरूजनांची आभारी आहे.

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील डॉ.मंजुश्री घोरपडे नेहरू ज्युनि. कॉलेज कोल्हापूरच्या सौ. शमा मुजावर यांनी तसेच श्री.माळगे सर, श्री.सुधीर लेंडवे सर, श्री.शिखरे सर यांनीही मला वेळोवेळी सहकार्य व प्रोत्साहन दिले आहे त्यांची मी आभारी आहे. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ.बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील दुर्मिळ संग्रह विभागातील श्री.शफीक देसाई यांचेही मला सहकार्य लाभले. त्यांची मी आभारी आहे. या ग्रंथालयातील नियतकालिके विभाग, संदर्भ विभाग, इंटरनेट विभाग तसेच शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र येथे मला प्रबंधासाठी

आवश्यक असणारी संदर्भ साधने उपलब्ध झालीत. याबद्दल या सर्व विभागांची व केंद्रांची मी आभारी आहे.

शासकीय अभिलेख कार्यालय, कोल्हापूर व करवीर नगरवाचनालय, कोल्हापूर यांनीही मला वेळोवेळी प्रबंधासाठी आवश्यक असणारी साधनसामुग्री उपलब्ध करून दिली. त्यांच्या या सहकार्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

ज्यांच्या कष्टाच्या जाणीवेतून मला शिक्षणाची प्रेरणा मिळाली, ज्यांच्या प्रेरणेतून हा शोधप्रबंध साकार झालेला आहे, ते माझे आई वडील सौ.अलका अरविंद वेल्हाळ व श्री.अरविंद राजाराम वेल्हाळ यांचा मला भावुकतेने उल्लेख करावासा वाटतो. त्यांनी मला कायमचे ऋणाईत ठेवले आहे. माझी बहिण कु.अमृता अरविंद वेल्हाळ व भाऊ अमित अरविंद वेल्हाळ यांचीही मला मोलाची मदत झाली आहे त्यांचे मी आभार मानते.

माझे सहस्नेही शुभांगी माने, वृषाली भोसले, शरयू यादव, जयश्री कांबळे, सौ.लक्ष्मी भोसले, इंद्रजीत भोसले, अनिल कुंभार, संजय नवले, चांगदेव बंडगर, महेश घाटगे, अमोल भगत, बाळकृष्ण माळी यांचेही सहकार्य मला लाभले. या सर्वांच्या सहकार्यातूनच व प्रोत्साहनामुळेच हा प्रबंध पूर्ण होऊ शकला त्याची मी आभारी आहे.

शेवटी या संशोधन कार्यासाठी ज्यांनी ज्यांनी मला सहकार्य केले, प्रोत्साहन दिले आणि माझ्यासाठी सुयश चिंतिले त्या सर्व ज्ञात अज्ञातांचे मी मनःपूर्वक ऋण व्यक्त करते.

कु.अस्मिता अरविंद वेल्हाळ

स्थळ : कोल्हापूर

दिनांक :